| | | |
|---|---|---|
| **विषय** : मराठी | **QUESTION PAPER** | **एकूण गुण** : २० |
| **इयत्ता** : १० वी (E.M.) | **संतवाणी अ, आ** | **वेळ** : ४५ मि. |

**प्र. १ : पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **(०८)**

**I) उत्तरे लिहा.** **१**

i) मेघाला विनवणी कोण करतो?

ii) कोण ते लिहा. **१**

i) परमेश्वराचे दास → ______

ii) कनवाळू स्वभाव → ______

अग्निमाजि पडे बाळू।
माता धावें कनवाळू ॥१॥
तैसा धावे माझिया काजा।
अंकिला मी दास तुझा ॥२॥
सेवेचिं झेंपावें पक्षिणी ।
पिलीं पडतांचि धरणीं॥३॥
भुकेलें वत्सरावें ।
धेनु हुंबरत धांवे ॥४॥
वनवा लागलासे वनीं।
पाडस चिंतीत हरणी ॥५॥
नामा म्हणे मेघा जैसा।
विनवितो चातक तैसा ॥६॥

**II) आकृती पूर्ण करा.** **२**

मनातील भक्तीभाव
व्यक्त करण्यासाठी
नामदेवांनी दिलेली उदाहरणे


**III) खालील ओळींचे भावसौंदर्य तुमच्या शब्दांत सांगा.** **२**

"नामा म्हणे मेघा जैसा।
विनवितो चातक तैसा॥६॥

**IV) पक्ष्याचा / प्राण्याचा आपल्या पिलाशी असलेल्या संबंधाबाबत तुमचा अनुभव लिहा.** **२**

**प्र. २ : खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनानुसार कृती करा.** **(०८)**

**I) i) आकृती पूर्ण करा.** १




**ii) योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.** १

चकोर ………… पिऊन जगतो. (पाणी, अमृत, सूर्यकिरण, चंद्रकिरण)

> जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी।
> जीवन जैसे का जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ॥
> जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ।
> उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळी सुखदाता ॥
> उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।
> योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखाची विकृती पैं नाही ॥
> उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्वतां।
> योगियांचे गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां ॥
> मेघमुखें अध:पतन । उदकाचें देखोनि जाण ।
> अध:पातें निवती जन । अन्नदान सकळांसी ॥
> तैसे योगियासी खालुतें येणे । जे इहलोकीं जन्म पावणें ।
> जन निवती श्रवण कीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ॥

**II) खालील तक्ता पूर्ण करा.** २

योगी पुरुष आणि जीवन (पाणी) यांच्यातील फरक स्पष्ट करा.

| **जीवन (पाणी)** | **योगी पुरुष** |
|---|---|
| १) | १) |
| २) | २) |
| ३) | ३) |
| ४) | ४) |

**III) खालील काव्यसौंदर्य तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.** २

B KUMAR'S ACADEMY

जेवी चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवी पिलियांसी।
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ।

**IV) योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे. हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.** २

**प्र. ३ गटात न बसणारा शब्द लिहा.** २

१. खारट, तुरट, गोड, गोडी, तिखट.

२. भात, भाजी, मुळा, वरण, चपाती.

**प्र. ४ वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणताही एक)** २

१. प्रशंसा करणे.

२. पळ काढणे.

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 **+91 9619619937, 0250-2334511**

# B.KUMAR'S ACADEMY


**विषय** : मराठी **QUESTION PAPER** **एकूण गुण** : २०

**इयत्ता** : १० वी **गद्य : शाल** **वेळ** : ४५ मि.

**प्र. १ : खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(०७)**

**I) आकृती पूर्ण करा.**

i) नारायण सुर्वे गाजवत १



ii) नारायण सुर्वे यांना कार्यक्रमात या वस्तू मिळत १

१) ................................ २) .........................

एकदा मी पु. ल. देशपांडे यांच्याकडे काही एका निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढ्यात सुनीताबाईंनी मला थांबवले व विचारले, "तुम्हांला शाल दिली तर चालेल काय?"

मी एका पायावर 'हो' म्हटले पु. ल. व सुनीताबाई यांनी मला शाल द्यावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली. वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली, पाचपन्नास रूपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले. आणि म्हटले, "त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस" या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, "या शाली घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे."

**II) उत्तरे लिहा.**

i) सुनीताबाईंनी लेखकांना विचारलेला प्रश्न ......................... १

ii) विधान पूर्ण करा. १

परिच्छेदात उल्लेख केलेली नदी .........................

(गंगा, गोदावरी, कृष्णा, कावेरी)

**III) स्वमत** ३

"त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस" वरील विधानाचा भावार्थ तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. २ अ) पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** (०७)

**I) आकलन कृती**

**कारण लिहा.**

i) वृद्ध भिकाऱ्याने शाली विकल्या. १

१) ............................... २) .............................

ii) शालीचा भिकाऱ्याचे केलेला उपयोग. १

१) .......................... २) .............................

दुसऱ्या दिवशी मी दोन शाली घेऊन ओंकारेश्वराला जाण्यास उसंत लाभली नाही. त्यानंतर मी नेहमीप्रमाणे ये-जा करत राहिलो. मग एकदम त्या भिक्षेकरी वृद्धाची आठवण आली. तो नेहमीच्या ठिकाणी नव्हताच. तेथील पुलावर चक्कर मारावी म्हणून मी उठलो व पुलावरून चालू लागलो.

पुलाच्या जवळपास मध्यावर तो भिक्षेकरी म्हातारा दिसला. मी लगबगीने त्याच्याकडे गेलो. पाहतो तो काय, तीच चिरगुटे अंगाखाली व अंगावर, तेच कुडकुडणे, तेच दिनवाणे जिणे?

मी म्हटले, ''बाबा, तुम्ही मला ओळखले?''

त्याने नकारार्थी मान हालवली.

मग मीच म्हटले, ''बाबा, पाच - सहा दिवसांपुर्वी तुम्हांला दोन शाली दिल्या होत्या. आठवते?''

यावर म्हातारा खुलला व पुन्हा हात जोडून म्हणाला, ''हे भल्या माणसा, तू लई मोठा म्यास्नी शाली दिल्या! पण बाबा, म्या भिकाऱ्याला शाली कशा शोभतील? त्या शोभेपेक्षा पोटाची आग लई वाईट! मी शाली इकल्या व दोन तीन दिवस पोटभर जेवून घेतलं बाबा! आमचं हे असलं जिणं! तुझं लई उपकार हायेत बाबा.''

शालीची शोभा आणि ऊब व पोटाची आग आणि अन्नाची ऊब!

भुकेल्यास अन्न द्यावे, तहानलेल्यास पाणी द्यावे आणि हेही जमले नाही, तर अभाग्यांना सन्मानाच्या शाली तरी द्याव्यात!

**II) i) चौकटी पूर्ण करा.** १) भुकेल्यास → [ ] १

२) तहानलेल्यास → [ ]

**ii) चूक की बरोबर ते लिहा.** १

लेखकांनी भिकाऱ्याला नवीन कपडे दिले.

**III) स्वमत** ३

'भिकाऱ्याने केलेला शालीचा उपयोग'याविषयी तुमचे मत लिहा.

**प्र. २ ब) शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा.** १

१) जिवाला जीव देणारा

**क) पुढील दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.** ५

- गावात सर्कस ---- दुकानदाराची हत्तीसोबत मैत्री ---- हत्तीला खायला देणे ---- गुलाब ---- एक दिवस गंमत ---- सुई टोचणे ---- अंगावर घाण -पाणी-- तात्पर्य.

***

B.KUMAR'S ACADEMY

| | | |
|---|---|---|
| **विषय** : मराठी | **QUESTION PAPER** | **एकूण गुण** : २० |
| **इयत्ता** : १० वी | **४. उपास स्थूलवाचन - मोठे होत असलेल्या मुलांनो** | **वेळ** : ४५ मि. |

**प्र. १ : खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(०७)**

**I) आकलन कृती**

i) लेखकाच्या खाजगी उपोषणाची हकीकत माहीत झाल्यावर मिळणाऱ्या प्रतिक्रिया. २

१) .......................... २) .................... ३) ....................

माझ्या खाजगी उपोषणाची हकीकत चाळीत जाहीर झाली आणि येता जाता ही माझी, 'नाही ती भानगड' आहे, उगीच 'हात दाखवून अवलक्षण'आहे, 'पेललं नाही तेव्हा खाजगी झाल!' अशी वाक्य माझ्या कानांवर येऊ लागली; पण मी कोणत्याही टीकेला भीक घालणार नव्हतो. 'एकशे एक्क्याऐंशी पौंड' रात्रंदिवस ते कार्ड माझ्या डोळ्यांपुढे नाचत होते. वजन कमी झाले पाहिजे, या विचाराने माझी झोप उडाली. झोप कमी झाली तर वजन उतरते या विचाराने मला त्याचेही काही वाटत नव्हते. मी पूर्वीसारखा गाढ झोपत नाही यावर धर्मपत्नीचा मात्र अजिबात विश्वास नव्हता, "घोरत तर असता रात्रभर!" अशासारखी दुरुत्तरे ती मला करत असे.

"दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा!" अशी भीष्मप्रतिज्ञा करून मी आहारशास्त्रावरच्या पुस्तकात डोके घालू लागलो. प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीयुक्त द्रव्ये वगैरे शब्दांबद्दलची माझी आस्था वाढू लागली. साऱ्या ताटांतले पदार्थ मला न दिसता नुसत्या 'कॅलरीज' मला दिसू लागल्या आणि आनंदाची गोष्ट अशी, की वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले. इतकेच काय, परंतु ज्या आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपवासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला 'डाएटचा' सल्ला दिला. उदाहरणार्थ - सोकाजी त्रिलोकेकर.

"तुला सांगतो मी पंत, 'डाएट' कर. बटाटा सोड. बटाट्याचं नाव काढू नकोस."

"हो! म्हणजे कुठं राहता? म्हणून विचारल तर नुसतं, 'चाळीत राहतो' म्हणा. 'बटाट्याची चाळ' म्हणू नका वजन वाढेल! खी: खी: खी:!" जनोबा रेगे या इसमाला काय म्हणावे हे मला कळत नाही. नेहमी तिरके बोलायचे म्हणजे काय!"

**II) चौकटी पूर्ण करा.** १

i) चौकोन पूर्ण करा. अ) लेखकाचे वजन → [ ]

ब) लेखक या विषयावरची पुस्तके वाचू लागले → [ ]

ii) सोकाजी त्रिलोकेकर यांनी दिलेला सल्ला ................................ १

**III) स्वमत**

तुम्ही केलेला संकल्प आणि त्यामध्ये आलेल्या अडचणी याविषयी तुमचा अनुभव लिहा. ३

**प्र. २ : अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **६**

१) टिपा लिहा. डॉ. होमी भाभा.

२) मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत असे तुम्हांस वाटते?

३) 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते' हे विधान स्वअनुभवातून स्पष्ट करा.

**ब) प्रति-उपसर्ग असलेले दोन शब्द तयार करा.** **२**

**क) खालील शब्दांचे सामान्य रूप करा.** **१**

१) भाषीकांनी २) शिक्षकांचा

**ड) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **२**

१) पापपुण्य २) आईवडील

**इ) वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** **२**

परिश्रम करणे

***

# B.KUMAR'S ACADEMY

**विषय :** मराठी | **Question Paper** | **एकूण गुण :** ३०

**इयत्ता :** १० वी | **दोन दिवस, चुडीवाला, पत्रलेखन, सारांशलेखन** | **वेळ :** १ तास.

**प्र.१. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनूसार कृती करा.** **(०७)**

**I) चौकट पूर्ण करा.** १

अ) सेतुबंधन करणारे → [ ]

ब) तपोवनातील समाजकार्यासाठी खारीचा वाटा उचलणारे → [ ]

अब्दुल तपोवनात आला तेव्हा कार्यक्रम सुरु झाला होता. स्टेजच्या समोर, बाजूला मांडलेल्या खुर्च्यांवर काही निमंत्रित पाहुणेमंडळी बसली होती. अब्दुलला त्यांच्याबरोबर बसायला संकोच वाटला. तो तसाच उभा राहिला. तेवढ्यात खुद्द दाजीसाहेबांनीच त्याला बोलावून जवळच्या खुर्चीवर बसायला लावले. सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुरुवातीचे अध्यक्षांचे स्वागत वगैरे औपचारिक झाल्यावर दाजीसाहेबांनी बोलायला सुरुवात केली. अब्दुल बघतच राहिला, चौऱ्यांशी वर्षांच्या वृद्धाचा ताठपणा, उंच सडसडीत देहयष्टी, तेजः पुंज चेहरा, गौरवर्ण, पाढरेस्वच्छ धोतर, त्यावर बंद गळ्याचा कोट आणि डोक्याला केशरी फेटा, या वयातही आवाजातला खणखणीतपणा आणि बोलण्यातली ऐट यामुळे अब्दुल भारावून बघत राहिला, दाजीसाहेब बोलत होते.

"रामानं सेतुबंधन केलं; पण त्यासाठी अनेकांचा हातभार लागला. अगदी लहानशी खार; पण तिनंसुध्दा आपल्या शक्तीप्रमाने सेतुबंधनाला मदत केली. तशीच मदत या तपोवनासाठी देणाऱ्या व्यक्ती आम्हांला सुदैवाने लाभल्या आहेत. संक्रांतीला आणि जेष्ठ पोर्णिमेला बांगडया भरण्याचा प्रस्ताव जेव्हा समोर आला होता तेव्हा अनेक बांगडीवाल्यांना भेटून इथं येण्याबद्दल विनंती केली; पण कुणीही माझ्या विनंतीचा स्वीकार केला नाही. अब्दुलमियाँनी मात्र स्वतःहून इथं येण्याच आश्वासन दिलं आणि दरवर्षी न चुकता अब्दुलमियाँ इथं येतात. येथील भगिनींच्या जीवनात आनंदाचा वर्षाव करतात. वर्षातले दोन दिवस तपोवनात अतिशय आनंदाचे आणि उत्साहाचे असतात. कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता अब्दुलमियाँ न बोलवता दरवर्षी येतात. तपोवनातील स्त्रिया, मुलीबाळी त्यांच्या येण्याकडे डोळे लावून बसलेल्या असतात. अब्दुलमियाँचे हे समाजकार्य, ही मानवसेवा खरोखर फार फार मोठी आहे. अनमोल आहे आणि म्हणूनच आज त्यांचा सत्कार करण्याचं ठरल आहे.

**II) उत्तरे लिहा.** २

**i) दाजीसाहेबांचे व्यक्तिमत्त्व**

१) .......... २) .......... ३) .......... ४) ..........

**ii) कारण लिहा.** १

वर्षातले दोन दिवस तपोवनात अतिशय आनंदाचे आणि उत्साहाचे असतात.

**III) स्वमत** ३

"अब्दुलमियाँचे हे समाजकार्य, मानवसेवा खरोखर फार फार मोठी आहे."

विधानाचा भावार्थ तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र.२. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सुचनांनुसार कृती करा.** **(०८)**

**I) आकृती पूर्ण करा.** १

कवीचे
- दोन दिवस - [ ]
- दोन दिवस - [ ]

> दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.
> हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
> शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
> भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
>
> हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
> कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
>
> हरघडी अश्रू वळविले नाहीत; पण असेही क्षण आले
> तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.
>
> दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
> दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
> झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
> दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.

**II) उत्तरे लिहा** १

**i) कवी जगाच्या शाळेत या गोष्टी शिकले.**

१) ..................... २) .............

**ii) चौकट पूर्ण करा** १

अ) दारिद्र्याकडे गहाण राहिलेले → [ ]

ब) कवीचा जवळचा मित्र → [ ]

**iii) आकृती पूर्ण करा.** १

शेकडो वेळा
- चंद्र - [ ]
- तारे - [ ]

**III) काव्यसौंदर्य :**

भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली. या ओळीतील भावसौंदर्य विशद करा. २

IV) कवितेचा भावार्थ तुमच्या शब्दांत लिहा. २

**प्र.३. पत्रलेखन** ६

eJeÅeeLŸeeme"e
meJeCemeOee
lJeje keâje!
lJeje keâje!!

meJe Øekeâej Ûe
mšMeveje meeenlÙe
eceUCÙeeÛe SkeâceJe e"keâeCe



mLeU
ce. Yeejle mšMeveje ceeš
peeieÕeje Ûeekeâ,
heCe - 411 002

mšMeveje meeenlÙeeÛÙee ceeieCeemee"e meÙeepekeâevee he$e euene.

**प्र.४. सारांश लेखन** ६

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश शब्दात सारांश लिहा.**

पु. लं. चे व्यक्तिमत्त्व हे मोठे गमतीदार आहे; गुंतागुंतीचेही आहे. त्यांना जुन्यातल्या चांगल्याची ओढ आहे. आधुनिकतेचेही आकर्षण आहे. नवीन विचाराशी ते तादात्म्य पावतात. त्यांची जिज्ञासा दुर्दम्य आहे; वाचन चौफेर आहे. काही तरी झपाटणारे वाचनात आले की, आसपासच्या लोकांना फोन करुन किंवा पत्रे लिहून त्यात सहभागी करुन घेण्याचा उत्साह आहे. माणुस या गोष्टीत त्यांना अतोनात रस आहे. भरडला जाना-याबद्दल अस्सल कळवळा आहे. त्यांचे स्वतःचे रागलोभ माणसासारखेच आहेत. पण ते असतानाही त्यांचे साहित्यिक भान सुटले नाही. नेमाडयांचे पुलंशी फारशे कधी जुळले नाही. पण ती तेढ कोसलाच्या रसग्रहणाच्या आड येत नाही. ते 'कोसलाची' प्रशंसा करु लागले की, त्यांचे तोंड बंद करणे कठीण असते. पु.शि. रेगे व्यक्ती म्हणून त्यांना कधी आवडले नाहीत. पण पुशिंच्या काव्यावर त्यांचे नितांत प्रेम होते.

B.KUMAR'S ACADEMY

**प्र.५.अ. वाक्यरुपांतर** १

दररोज अभ्यास करावा. (आज्ञार्थी करा)

**ब. विरूध्दार्थी शब्द लिहा.** २

१) संथ × ------ २) सुख × ------

३) प्रत्यक्ष × ------ ४) जबाबदार × ------

***

B.KUMAR'S ACADEMY

**विषय** : मराठी **Question Paper** **एकूण गुण** : ३०

**इयत्ता** : १० वी **फूटप्रिन्ट्स, उर्जा शक्तीचा जागर, जाता अस्ताला** **वेळ** : १ तास

**प्र.१. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** (०७)

**I) आकृती पूर्ण करा.** २

| लेखकांना शिकवत असलेले शिक्षक | |
|---|---|
| - | |
| - | |
| - | |
| - | |

याच हायस्कूलमध्ये मला भावे सर भेटले. ते आम्हांला भौतिकशास्त्र शिकवत. विज्ञानातील हा विषय शिकवताना त्यांनी केवळ शास्त्र शिकवलं नाही, तर त्या विषयाची गोडी लावली आणि त्याचबरोबर जीवनाचं फार मोठं तत्त्वज्ञान शिकवलं.

एके दिवशी शाळेत त्यांनी एक प्रयोग करुन दाखवला. भिंगाच्या साहाय्यानं सूर्यकिरणांची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो हे त्यांनी दाखवलं आणि माझ्याकडे बघून ते म्हणाले, माशेलकर तुमची उर्जाशक्ती एकत्र करा, काहीही जाळता येईल, एकीकडे मला एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि दुसरीकडे विज्ञान समजलं.

आयुष्याचं फार मोठं तत्त्वज्ञान मला भावे सरांच्या या शिकवणुकीतून गवसलं. त्यांना मी कसा विसरु शकेन? भावे सरांप्रमाणेच माझ्या शालेय आणि पुढील शैक्षणिक जीवनात जोशी सर, शिर्के सर, श्री. मालेगाववाला या सर्वांनीच माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी उत्तम मार्गदर्शन केलं, संस्कार केले. आयुष्याच्या उभारणीसाठी मला याच शाळेने आणि याच शिक्षकांनी भरपूर शिदोरी दिली. संघर्षासाठी आत्मविश्वास मिळवून दिला. जगण्याचे भान दिले. आजही फिरुन ते शाळेचे दिवस आठवताना एकीकडे, प्रचंड दारिद्र्याचा सामना करतानाचे क्षण न् क्षण आठवतात आणि त्याचवेळी माझी आई, माझे शिक्षक, माझी शाळा हे माझे संस्कारकेंद्र डोळ्यासमोर उभे राहते. मी पुन्हा मनोमनी शाळेत जाऊ लागलो.

B.KUMAR'S ACADEMY

**II) उत्तरे लिहा.**

**i) लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडण-घडणीत यांनी महत्त्वाची भूमिका निभावली.** १

१) ......... २) .........

**ii) भावे सर शिकवत असलेला विषय** → ☐ १

**III) स्वमत** ३

'माझ्या जीवनातील शिक्षकांचे स्थान' या विषयावर तुमचे विचार लिहा.

**प्रश्न २ : खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** (०७)

**I) आकलन कृती**

**i) अभिषेकच्या बाबांच्या मते आपण या गोष्टी विसरून गेलो आहोत.** १

१) ............. २) ..............

**ii) चौकटी पूर्ण करा.** १

अ) रेखा मावशीची पावलं अशी आहेत → ☐

ब) वातावरण प्रदुषित करणारा वायू → ☐

> "काका, हे एक शास्त्रीय सत्य आहे. तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलांचा काळा रंग ठरतो. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वावच नाही, म्हणून त्यांची पावलं आपल्यापेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत" सुमित बोलत होता, "बापरे, आपण फरशी घाण होण्याची गोष्ट करतो, पण आपण तर अवघं वातावरणच घाण, प्रदूषित करत असतो किती प्रचंड कार्बन चिकटलेला असतो, आपल्या पायांना! ग्लोबल वार्मिंगला हातभार लावतो आपण. तापानं फणफणलीय आपली धरती, आपल्या पायाला चिकटलेला हा कार्बन आपल्याला धुवायला हवा, मी ठरवलंय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार मला माझे पाय रेखामावशींसारखे चंदेरी हवेत" स्नेहल गहिवरून म्हणाली.
>
> अभिषेक भारावून म्हणाला, "माझ्या तर कॉलेज समोरच बसस्टॉप आहे. आजपासून मी बसनंच ये - जा करणार, ठरल एकदम!"
>
> "खरंय पोरांनो, आजकाल चालणं, सायकल वापरणं, विसरूनच गेलोय आपण अगदी कोपऱ्यावरून भाजी - जरी आणायची असली तरी आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरिता वेगळं, मॉर्निंग वॉकच नाटक करतो बसन प्रवास करणं तर आपल्याला कमीपणाचं वाटत; पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्या करिता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट" अभिषेकचे बाबा म्हणाले.
>
> रेखामावशी सगळ्यांच बोलणं लक्ष देऊन ऐकत होत्या. बोलता बोलता हलकेच त्यांनी आपल्या पायाचे ठसे फरशीवरचे ठसे ओल्या फडक्याने पुसून घेतले.
>
> "पाहयलंत, किती सहजपणे पुसले आपल्या मळलेल्या पायांचे ठसे रेखामावशींनी," सुमित म्हणाला.
>
> "पण आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे मात्र, आपल्याला इतक्या सहजपने नाही बरं पुसता येणार, त्या करता आपल्याला झाडं लावावी लागतील... या हिरण्यागर्द झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी उजळ होतील." सुमित भरभरून बोलत होता.

**II) उत्तरे लिहा**

**i) कार्बनचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय.** १

१) ................ २) ...............

**ii) कॉलेजला जाण्यासाठी** — स्नेहल - ☐ / अभिषेक ☐ १

B.KUMAR'S ACADEMY

**III) स्वमत** ३

'तापानं फणफणलीय धरती' ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा.

**प्र.३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

i) सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वत:च्या कल्पनेने लिहा.

ii) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणाऱ्या मानवी भावभावना शब्दबद्ध करा.

iii) तुम्हाला समजलेली कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

**प्र.४.खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनूसार कृती करा.** (०७)

**I) आकृती पूर्ण करा** २

विद्वत्तेचे वैशिष्ट्ये लिहा.

१. [ ] २. [ ] ३. [ ] ४. [ ]

विद्वता कोणाकडेही असो ती क्षणात मिळवता येणारी बाब नाही. ज्याप्रमाणे झाडाची मुळे एकदम खोल-खोल जाऊ शकत नाही, त्यासाठी महिने-वर्षे लागतात; परंतु जेवढी खोल मुळे असतात, तेवढया त्या झाडाचा पाया भक्कम असतो. तसेच विद्वतेचे आहे. जेवढया प्रयत्नाने ती मिळवाल तेवढे प्रभावी तुमचे व्यक्तीमत्व असेल. आपल्याला एकदाच विजेसारखे चमकायचे, की सूर्यासारखे सातत्याने प्रकाशित राहायचे, हे ठरवायचे आहे. विद्वता ही अशी बाब आहे, जी केवळ वेळेच्या सदुपयोगाने मिळते. बरे, तिला कोणी तुमच्याकडून काढून किंवा चोरुन घेऊ शकत नाही. ती मिळण्यातखूप धनसंपत्ती खर्ची घालावी लागत नाही; पण एकदा ती तुमच्याजवळ आली, की संपूर्ण राष्ट्र तुमच्या लखलखत्या प्रकाशात दिपून जाते. आपला कोणी सन्मान करावा अशी भावनाच मनातून निघून जाते, सर्वजण तुमच्या सहवासात येण्यासाठी, तुमचे आदरतिथ्य करण्यासाठी आतुर असतात. थोडक्यात, विद्वता तुम्हाला सर्व मिळवून देते, ज्याची तुम्ही स्वप्नातही अपेक्षा केलेली नसते.

**II) आकलन कृती**

**i) खालील घटनेचा किंवा कृतीचा परिणाम लिहा.** १

**घटना / कृती**

१. झाडाची मुळे खोल जाणे ........

**ii) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.** १

१. विजेसारखे चमकणे

**III) स्वमत** ३

व्यक्तीला विदया प्राप्त झाल्यानंतर कोणकोणत्या गोष्टी मिळू शकतात ते स्पष्ट करा.

**प्र.५.पुढील शब्दातील अक्षरापासून प्रत्येकी दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.** ३

१) वातावरण

२) नागरिक शास्त्र

३) मानसशास्त्र

***

B.KUMAR'S ACADEMY

विषय : मराठी | Question Paper | एकूण गुण : ३०
इयत्ता : १० वी | ९. औक्षण, १०. रंग साहित्याचे, जाहिरातलेखन + बातमीलेखन | वेळ : १ तास

**प्र.१. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनूसार कृती करा.** (०८)

**I) उत्तरे लिहा.**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.** २

i) डोळे भरुन पहावे असे दृश्य कोणते?

ii) कवितेत कुणाचे औक्षण केले आहे?

**आ) योग्य पर्याय निवडा.**

कवितेतील दिनदुबळे' म्हणजे ........ १

१. कष्टाचे पैसे नसलेले

२. सैनिकाबरोबर लढणारे

३. शारिरीकदृष्ट्या सक्षम नसलेले.

४. सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय.

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान:
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंगावे बंबरा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझे पाऊल जिद्दीचे;
तुझी विजयाची दौड
डोळे भरुन पहावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळयांचे असें
तुला एकच औक्षण

**II) आकलन कृती.**

**i) चौकटी पूर्ण करा.** १

अ) मुठीमध्ये नाही - [ ]

आ) शिरेमध्ये नाही - [ ]

**III) सैनिक सीमेवर तैनात असतो म्हणून आपण सुरक्षित राहतो, या विधानातील भाव स्पष्ट करा.** २

**IV) देशसेवा हीच ईश्वरसेवा असे समजून कार्य करणा-या सैनिकांसाठी तुम्हाला काय करावेसे वाटते ते लिहा.** २

**प्र. २. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** (०६)

**I) आकलन कृती.**

i) २




सुश्रुत : तुम्ही सगळे कोण आहात?

कथा : अर, असा घाबरतोस काय? हे सगळे आपलेच मित्र आहेत. सगळ्यांशी चांगली मैत्री होईल तुझी. माझी ओळख तर तुला लहानपणापासूनच आहे. अरे, मी आहे कथा. गोष्ट माझंच दुसरं नाव.

सुश्रुत : आपली ओळख कशी काय?

कथा : आईच्या, आजीच्या तोंडून इसापनीती, पंचतंत्र, अकबर - बिरबल अशा गोष्टी ऐकत तुम्हांला मला वाचायची सवय लागते ना!

सुश्रुत : हो ऽऽ आता आठवलं आजी मला नेहमी कोल्हा, उंदीर, ससा - कासव यांच्या गोष्टी सांगायची.

कथा : बरं का सुश्रुत! आकर्षक सुरुवात आणि परिणामकारक शेवट ही माझी वैशिष्ट्ये.

सुश्रुत : तुझे काही प्रकार असतात का? कारण आज मराठीच्या मॅडम म्हणाल्या, "आपण 'साहस कथा' शिकू या."


कथा : अगदी बरोबर! परीकथा, बोधकथा, विज्ञानकथा, ऐतिहासिककथा हे माझेच अनेक उपप्रकार आहेत. शिवाय नाटक, मालिका, चित्रपट या सर्व ललित कलांचा पाया म्हणजे मी मूळ कथा दर्जेदार असल्याशिवाय कोणतीही कलाकृती उत्तम होऊ शकत नाही. एवढच नाही तर उत्तम निवेदनतंत्रामुळे मी खुलत जाते.

सुश्रुत : तुला निर्माण करणाऱ्या लेखकांची नावं सांग ना.

कथा : य. गो. जोशी, वि. स. खांडेकर, विभावरी शिरूरकर, व. पु. काळे, शंकर पाटील, अण्णाभाऊ साठे, बाबूराव बागूल, द. मा. मिरासदार यासारख्या नामवंत लेखकांनी आपल्या उत्तोमोत्तम कथांनी मराठी वाचकांना तृप्त केलय.

**II) आकलन कृती**

मराठीतील प्रसिद्ध कथाकार २



B.KUMAR'S ACADEMY

**III) स्वमत**

कथेची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा. ३

**प्र. ३. खालील शीर्षकावरून बातमी तयार करा.** ५

जून महिना उजाडला तरी शेतकऱ्यांना बँकांकडून कर्ज मिळेना!

**प्र. ४. जाहिरात वाचून त्याखाली दिलेल्या कृती करा.**

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 **+91 9619619937, 0250-2334511**

त्वरा करा!    त्वरा करा!!    त्वरा करा!!!

*** छंद वर्ग ***

**हस्तकला, चित्रकला, मेहंदी, रांगोळी**

वेळ : सकाळी ७ : ११

संध्याकाळी ६ : ९

सर्व वयोगटासाठी (वयाची अट नाही)

अनुभवी शिक्षक

५०० रु दरमहा

**एकाच घरातील दुसऱ्या व्यक्तीस ४०% सूट**

**१)** **छंद वर्गाची वैशिष्ट्ये** २

१)    २)    ३)    ४)

**२)** **छंद वर्गात शिकवले जाणारे विषय** २

१)    २)    ३)    ४)

**३)** **एकाच घरातील दुसऱ्या व्यक्तीला मिळणारा फायदा.** १

**प्र. ५ : सामासिक शब्दाचा विग्रह करा व समासाचे नाव लिहा.** २

१) त्रिकोण    २) रामलक्ष्मण

**प्र. ६ : समानार्थी शब्द लिहा.** २

१) आदेश –    २) कसोटी –    ३) पाहुणा –    ४) उत्कृष्ट

**प्र. ७ : वाक्प्रचाराचा अर्थ लिहा.** १

उत्कंठा वाढणे

***

B.KUMAR'S ACADEMY

| | | |
|---|---|---|
| विषय : मराठी | Question Paper | एकूण गुण : ३० |
| इयत्ता : १० वी | जंगल डायरी, रंग मजेचे रंग उद्याचे | वेळ : १ तास |

**प्र. १ : खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** (०७)

**I) चौकटी पूर्ण करा** २

वाघिणीने यापैकी एकाची शिकार केली → [ ] [ ] [ ] [ ]

साधारणत: कुत्र्यापेक्षा लहान आकाराची ही पाच महिन्यांची पिल्लं होती. या वयात लहान मुलं जशी खेळकर असतात, तशी ही खेळकर होती. एकमेकांचा पाठलाग करणं, मारामारी करणं, पाण्यात उड्या घेणं असे खेळ सुरू झाले. मध्येच आई वळून एखाद्या पिल्लाला मायेने चाटत होती. थोडावेळ बसल्यावर ती पटकन उभी राहिली. डोकं वळवून तिनं हळूच, ऑऽवऽ असा आवाज केला. हा पिल्लांना मागं येण्याबद्दलचा इशारा होता. लगेच वळून ती चालायला लागली. हिनं जंगलात कुठंतरी नक्कीच एखादं सांबर, रानगवा, नीलगाय, रानडुकराची शिकार साधली असावी; पण अशी शिकार जड असल्यानं ती उचलून पिल्लापर्यंत आणणं शक्य नसतं. त्यामुळे पिल्लांजवळ येऊन घटकाभर पाण्यात बसून तिनं विश्रांती घेतली होती आणि आता ती पिल्लांना त्या शिकारीकडं घेऊन जात होती. या चार पिल्लांसोबतच स्वत:च पोट भरण्यासाठी तिला सतत कोणती - कोणती शिकार करणं आवश्यकचं होतं. त्या कलेत ती चांगली पारंगत होती.

वाघिणीने नाला पार करून बांबूच्या गंजीत पाय ठेवला. आत शिरण्याआधी तिनं वळून पिल्लं सोबत येताहेत की नाही हे पाहून घेतलं. दोन पिल्लं तिच्या मागोमाग निघाली होती; पण दोघांना अद्याप भान नव्हतं. ती पाण्यातच एकमेकांशी खेळण्यात दंग झाली होती. वाघिणीनं परत त्यांना बोलावणारा आवाज काढला. आईच्या या आवाजाबरोबर दोन्ही पिल्लांनी आपला खेळ थांबवला आणि पळत सुटली. दोनच मिनिटांत पिल्लांना घेऊन वाघीण जंगलात दिसेनाशी झाली. आज मी वाघिणीतल्या आईची एक वेगळीच झलक बघितली होती. माझ्या व्याघ्र अनुभवात मोलाची भर घालणारा हा अनुभव होता.

**II) आकलन कृती :**

**i) आकृती पूर्ण करा.** १

वाघिणीच्या पिल्लांचे खेळ → [ ] [ ]

**ii) चौकटी पूर्ण करा.** १

i) वाघिणीने पार केलेला - [ ]

ii) वाघिणीच्या पिल्लांची संख्या - [ ]

**III) स्वमत :** ३

'आज मी वाघिणीतल्या आईची वेगळीच झलक बघितली होती' या विधानाचा भावार्थ तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**प्र. २ : अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** (०८)

**I)** कवितेच्या आधारे पाऊस पडण्याच्या चक्राचा ओघतक्ता तयार करा. २

**डोंगरावर बिया उधळणे**

↓

[ ]

↓

[ ]

फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उदयाचे, जपून ठेवू सृष्टी...
धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी..
रंग मजेचे, रंग उदयाचे
उधळू, फेकू बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी
रंग मजेचे,
डोंगरातून वाहत येते, खळखळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी
रंग मजेचे, रंग उदयाचे
मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती
आभाळाच्या छत्राखाली, एक अनोळी तुष्टी....
रंग मजेचे, रंग उदयाचे
हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भ रेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

**II) आकलन कृती :**

**i) आकृती पूर्ण करा.** १

काळी आई जगण्यासाठी अपेक्षित कार्य → [ ]

काळी आई जगण्यासाठी अपेक्षित कार्य → [ ]

**ii) चौकटी पूर्ण करा.** १

१) यांचे आहेत ताटवे - [ ]

२) पाठबळ द्यावे असे हात - [ ]

B.KUMAR'S ACADEMY

**III) काव्यसौंदर्य :** २

'उधळून फेकू, बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे' या ओळीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

**IV) पृथ्वीला वाचवण्यासाठी काय - काय करावे, असे कवयित्रीला वाटते ते लिहा.** २

**ब) पुढील ओळींचे रसग्रहण करा.** (०४)

'हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भ रेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी'

**प्र. ३ :** तुमच्या शाळेत होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाची जाहिरात तयार करा. ५

**प्र. ४ : अ) खालील कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** ४

१) अचंबित होणे　　२) पळ काढणे

३) कान देऊन ऐकणे　　४) कंठस्नान घालणे

**प्र. ४ : ब) विरूध्दार्थी शब्द लिहा.** २

१) बोलका × -----　　२) ज्ञानी × -----

B.KUMAR'S ACADEMY

* * *

B.KUMAR'S ACADEMY

| | | |
|---|---|---|
| विषय : मराठी | Question Paper | एकूण गुण : २० |
| इयत्ता : १० वी | हिरवंगार झाडासारखं | वेळ : ४५ मि. |

**प्र. १ : अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** (०८)

**I) आकलन कृती :** १

**अ) आकृती पूर्ण करा**

झाडाकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी

**आ) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही एक)** १

i) झाडांच्या जीवनाचं गाणं कशात दडलेलं आहे?

ii) जीवन कशासारखे जगावे?

| | |
|---|---|
| झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत<br>धारण करून तपश्चर्या करत...<br>पक्षी झाडांचे कुणीच नसतात<br>तरीही झाड त्यांचं असतं<br>मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते<br>झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर<br>अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब<br>झाडाकडे टक लावून पाहिलं तर<br>शरीरभर विरघळतो हिरवा रंग<br>रक्त होते क्षणभर हिरवेगार<br>आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत | झाडाचे बाहु सरसावलेले असतात, मुसाफिरांना कवेत घेण्यासाठी<br>पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं<br>नव्या नवरीसारखं<br>झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीर भर पालवी<br>अन झटकली जाते मरगळ<br>पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं<br>एक संथ गाणे दडलेले असते.<br>हसावं कसं सळसळत्या पानासारखं.<br>मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत<br>जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं<br>रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं! |

**II) उत्तरे लिहा :**

**i) पुढील ओळीचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.** १

हसावं कसं सळसळ पानांसारखं

**ii) चौकटी पूर्ण करा.** १

१) फुटते शरीरभर पालवी याचा अर्थ - ______ २) क्षणभर हिरवेगार होणारे - ______

**III) काव्यसौंदर्य :** २

'अलगद उतरतातं दवांचे टपोरे थेंब' या ओळीचा भावार्थ लिहा.

**IV) 'झाडांचे मानवी जीवनातील स्थान' या विषयी तुमचे विचार स्पष्ट करा.** २

**ब) पुढील ओळीचे रसग्रहण करा.** ४

झाडांच्या पानांवरून वहीच्या पानावर

अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब'

**प्र. २ : दिलेल्या शब्दांवरून कथा लिहा.** ५

राजा ------ कोळी ------ पहारेकरी.

**प्र. ३ : अ) खालील विराम चिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा.** १

१) ! - ______ २) ? - ______

**ब) विरूध्दार्थी शब्द लिहा.** २

१) सत्कर्म × ----- २) संथ × -----

* * *

विषय : मराठी

इयत्ता : १० वी

## Question Paper

खरा नागरीक + स्वप्न करू साकार + व्युत्पत्ती कोश


एकूण गुण : ३०

वेळ : १ तास


**प्र. १ : अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** (०८)

**I) आकलन कृती :**

i) आकृतिबंध पूर्ण करा. १





ii) यातून श्रावण हसतो १



| | |
|---|---|
| या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार<br>नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार॥<br>फुलामुलांतून हसतो श्रावण<br>मातीचे हो मंगल तनमन<br>चैतन्याचे फिरे सुदर्शन<br>शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार॥<br>या हातांनी यंत्र डोलते<br>श्रमशक्तीचे मंत्र बोलते<br>उद्योगाचे चक्र चालते | आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार॥<br>हजार आम्ही एकी बळकट<br>सर्वांचे हो एकच मनगट<br>शक्तीचीही झडते नौबत<br>घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार॥<br>या विश्वाची विभव संपदा<br>जपू वाढवू आम्ही लाखदा<br>हस्त शुभंकर हवा एकदा<br>भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया<br>जयजयकार॥ |

**II) आकलन कृती :**

**i) आकृतिबंध पूर्ण करा.** २




**III) काव्यसौंदर्य :** २

'हजार आम्ही एकी बळकट,
सर्वांचे हो एकच मनगट' या ओळीतील विचार सौंदर्य स्पष्ट करा.

**IV) 'स्वप्न करू साकार' या कवितेत कविने बघितलेले स्वप्न तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.** २

**ब) पुढील ओळींचे रसग्रहण करा.** ४

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार,

**प्र. २ : खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** (०७)

**I) आकलन कृती :** १

**i) आकृती पूर्ण करा.**

[ ] ← निरंजन गुरुजींचा लाडका असण्याची कारणे → [ ]

**ii) विधान पूर्ण करा.** १

निरंजनचा शेवटचा पेपर ..................

निरंजन आज भल्या पहाटे उठून अभ्यासाला बसला होता. आज शेवटचा, नागरीकशास्त्राचा पेपर तो झाला की संपली परीक्षा. इतिहास, भूगोल आणि नागरीकशास्त्र, या तिन्ही विषयांचा केवढा अभ्यास करावा लागतो. त्यात हे नागरीकशास्त्र जरा अवघडच.

पहाटेची, सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते, हा भडसावळे गुरुजींनी दिलेला सल्ला अगदी योग्य होता. सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो. शरीरही पुरेशा विश्रांतीमुळे ताजंतवानं बनलेलं असतं. प्रसन्न वातावरणामुळे मनही अभ्यासात चटकन लागू शकतं. ते नसेल तर पक्ष्यांचं सुमधुर संगीत साथीला असतंच, अशा आल्हाददायक वातावरणात संस्कृतचा एखादा श्लोक चटकन पाठ होतो. एरवी न कळलेलं गणित चटकन कळतं. त्याची रीतही लक्षात राहते, हा निरंजनाचा अनुभव. त्यामुळेच भडसावळे गुरुजींचा हा सल्ला त्याला मोलाचा वाटे.

निरंजनची गुरुजींवर अपार श्रद्धा होती. तसं गुरुजींचं ही निरंजनवर खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता, कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही या जगात त्याचं गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आई वडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं. आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला. 'रडत बसू नको शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर. मावशी देईल ते खा आणि इथंच रहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.'

B.KUMAR'S ACADEMY

**II) आकृती पूर्ण करा.** २

भडसावळे गुरुजींच्या मते सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते कारण
→ i)
→ ii)
→ iii)
→ iv)

**III) स्वमत् :**


'रडत बसू नको शेण गोठा वगैरे पडतील ती सारी कामं कर' या विधानांचा तुम्हाला समजलेला

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 **+91 9619619937, 0250-2334511**

अर्थ लिहा. ३

**प्र. ३ : खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

i) पाठाबाहेरचे उदाहरणे शोधून खालील कृती सोडवा.





उदा. जल, नीर, तोय - पाणी

उदा. पान -
झाडाचे पान (पर्ण)
पुस्तकाचे पान (पृष्ठ)

**ii) व्युत्पत्ती कोशाचे कार्य लिहा.**

**iii) खालील मुद्यांवर परिच्छेद तयार करा.**




**प्र.४ : अ) जोड्या लावा.** २

| ‘अ’ | ‘ब’ |
|---|---|
| दुहेरी अवतरण चिन्ह | ‘ ’ |
| संयोग चिन्ह | “ ” |
| अर्ध विराम | - |
| ऐकरी अवतरण चिन्ह | ; |

**ब) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यात बदल करा.** १

१) आज पहाटे रानात उजेड नव्हता. (होकारार्थी करा)

**क) वाक्प्रचार आणि अर्थ यांच्या जोड्या लावा.** २

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| १) उत्कंठा वाढवणे | - जाणीव ठेवणे |
| २) रममाण होणे | - चाल देणे |
| ३) स्वरात चढवणे | - गुंगून जाणे |
| ४) भान ठेवणे | - कुतुहल वाढणे. |

* * *

B.KUMAR'S ACADEMY